# डिजीटल हयातीचा दाखला (जीवन प्रमाण)

## अनुक्रमणिका


प्रस्तावना .......... 2

निवृत्तीवेतन धारकांसाठी हयातीच्या दाखल्याबाबत विद्यमान कार्यपध्दती .......... 3

निवृत्तीवेतन धारकांसाठी हयातीच्या दाखल्याबाबत पर्यायी कार्यपध्दती .......... 4

निवृत्तीवेतनधारकांनी स्वत:ची नोंदणी करणे .......... 5

हयातीच्या दाखल्याचे प्रमाणीकरण .......... 6

आपले जीवन प्रमाणपत्र मिळवा .......... 6

हयातीचा दाखला / प्रमाणपत्र (लाईफ सर्टिफिकेट) .......... 6

निवृत्तीवेतनाचे अधिदान करणारी अधिकृत संस्था (पेन्शन वितरण संस्था) .......... 6

इलेक्ट्रॉनिक वितरण .......... 7

निवृत्त वेतनधरकांची माहिती .......... 8


J-29895(1-8)

# प्रस्तावना

सेवानिवृत्ती वेतन धारकांना त्यांचे निवृत्ती वेतन सुरळीतपणे सुरू राहण्यासाठी दरवर्षी जीवन प्रमाणपत्र संबंधित आस्थापनेला ठराविक कालावधीत सादर करावे लागते. अन्यथा त्यांचे निवृत्तीवेतन थांबविण्यात येते.

जीवन प्रमाणपत्र मिळविणे व ते संबंधित आस्थापनेस विहित वेळेत सादर करणे ही प्रक्रिया पूर्ण करण्यास निवृत्ती वेतनधारकांना विशेषतः वयस्कर आणि निराधार वेतनधारकांसाठी जिकरीची गोष्ट होते. अनेक सरकारी कर्मचारी आपल्या सेवानिवृत्तीनंतर मुंबई व्यतिरिक्त वेगवेळया ठिकाणी स्थायिक होतात. अशा निवृत्ती वेतनधारकांना जीवन प्रमाणपत्र विहित वेळेत संबंधित आस्थापनांना सादर करणे कठीण होते.

भारत सरकारच्या माहिती तंत्रज्ञान खात्याने जीवन प्रमाण ही पर्यायी संगणक कार्यप्रणाली निवृत्तीवेतनधारकांना व निवृत्तीवेतनाचे अधिदान करणास-या अधिकृत आस्थापनांना इलेक्ट्रॉनिक कार्यपध्दतीने डिजीटल स्वरूपात हयातीच्या दाखल्याची नोंदणी व त्याचे विहित कालावधीनंतर प्रमाणीकरण करण्यासाठी विकसीत केली आहे.

सदर कार्यप्रणाली प्रत्येक भारतीय नागरीकांकरीता भारतीय विशिष्ट ओळख प्राधिकरणाने (UIDIA) विकसीत केलेल्या संगणकीय कार्यप्रणालीमध्ये (आधारकार्डामध्ये) अद्ययावत असलेला तपशील आधारभूत मानते.

सदर कार्यप्रणाली निवृत्तीवेतनधारकांना व निवृत्तीवेतनाचे अधिदान करणा-या अधिकृत आस्थापनांना उपलब्ध करून देण्यात आली आहे. सदर संगणकीय कार्यप्रणालीद्वारे निवृत्तीवेतनधारकांसाठी डिजीटल स्वरूपात हयातीचा दाखला / प्रमाणपत्र तयार करण्याची, जतन करण्याची व परिरक्षित करण्याची सुविधा उपलब्ध आहे.



J-29895

# निवृत्तीवेतन धारकांसाठी हयातीच्या दाखल्याबाबत विद्यमान कार्यपध्दती

विद्यमान कार्यपध्दतीनुसार सर्व निवृत्तीवेतनधारकांना दरवर्षी हयातीच्या दाखल्याच्या विनिर्दिष्ट नमून्यात स्वतःच्या स्वाक्षरीसह निम्नलिखित तपशील भरलेले प्रपत्र, प्राधिकृत बँक अधिकारी / नजिकच्या पोलिस ठाण्यातील प्राधिकृत अधिकारी / नोंदणीकृत डॉक्टर / प्राधिकृत महानगरपालिका अधिका-यांकडून प्रमाणीत करून प्रमाणीत हयातीचा दाखला संबंधित निवृत्तीवेतन अधिदान करणा-या अधिकृत संस्थेकडे / आस्थापनेकडे सादर करणे अत्यावश्यक आहे.

- स्वतःचे संपूर्ण नाव
- आयकर स्थायी क्रमांक (PAN No.)
- वर्तमान निवासाचा संपूर्ण टपाल पत्ता पीन क्रमांकासहीत
- आधार क्रमांक (AADHAR No.)
- निवृत्तीवेतनाचे अधिदान करणाऱ्या अधिकृत आस्थापनेचे / संस्थेचे संपूर्ण नोंदणीकृत नाव, आस्थापनेचा संपूर्ण नोंदणीकृत टपाल पत्ता पिन क्रमांकासहीत
- बँकेचे नाव
- निवृत्तीवेतन बँक खाते क्रमांक
- बँकेचा आयएफएस संकेतांक
- बँकेचा एमआयसीआर संकेतांक
- वैयक्तिक दुरध्वनी क्रमांक (Personnel Mobile No.)
- वैयक्तिक ई टपाल पत्ता (Personnel E Mail ID)

संबंधित निवृत्तीवेतनधारकांनी उपरोक्त कार्यपध्दतीची अंमलबजावणी करून विनिर्दिष्ट कालावधीत हयातीचा दाखला प्राधिकृत बँक अधिकारी / नजिकच्या पोलिस ठाण्यातील प्राधिकृत अधिकारी / नोंदणीकृत डॉक्टर / प्राधिकृत महानगरपालिका अधिका-यांकडून प्रमाणीत करून व्यक्तिशः अधिकृत आस्थापनेकडे सादर केल्यांनतर पुढील कालावधीकरीता संबंधित निवृत्तीवेतनधारकाचे निवृत्तीवेतन आकारणी करण्याचे व त्याचे अधिदान करण्याचे काम सुरू ठेवले जाते.

परंतू ज्या निवृत्तीवेतनधारकांकडून विनिर्दिष्ट कालावधीत प्राधिकृत अधिकाऱ्यांनी प्रमाणित दाखले संबंधित निवृत्तीवेतनाचे अधिदान करणाऱ्या अधिकृत संस्थेकडे न पाठविल्यास संबंधित निवृत्तीवेतनधारकाचे निवृत्तीवेतन तात्पुरते खंडीत केले जाते.

तद्नंतर संबंधित निवृत्तीवेतनधारकांनी उपरोक्त कार्यपध्दतीची अंमलबजावणी करून प्राधिकृत अधिकाऱ्यांकडून प्रमाणित करून निवृत्तीवेतन अधिदान करणा-या अधिकृत संस्थेकडे / आस्थापनेकडे निम्नलिखित कागदपत्रांच्या स्वयंसाक्षांकीत प्रतींसह सादर केल्यांनतर संबंधित निवृत्तीवेतनधारकाचे निवृत्तीवेतन पुनःश्च सुरू केले जाते.

सदर हयातीच्या प्रमाणित दाखल्यासोबत निवृत्तीवेतनधारकाला निम्नलिखित कागदपत्रांच्या स्वयंसाक्षांकीत छायांकीत प्रती सादर कराव्या लागतात.

1. निवृत्तीवेतन पुस्तिकेचे आतील पान
2. बँक खाते पुस्तिकेचे आतील पान
3. पॅन कार्ड
4. आधार कार्ड



J-29895

तद्नंतर संबंधित निवृत्तीवेतन अधिदान करणाऱ्या अधिकृत आस्थापनेतील संबंधित कर्मचा-यांना खालील कार्यपध्दती दरवर्षी अवलंबवावी लागते.

1) निवृत्तीवेतनधारकांनी हयातीचे दाखल्यासोबत सादर केलेली उपरोक्त संदर्भित कागदपत्रे स्विकारणे, जतन व परिरक्षीत करणे.
2) उपरोक्त संदर्भित सर्व कागदपत्रे निवृत्तीवेतन आकारणी व अधिदान विभागात / कार्यालयात सुपूर्द करणे.
3) हयातीच्या दाखल्याची नोंद निवृत्तीवेतन आकारणी व अधिदान कार्यपध्दतीत अद्ययावत करणे.

## निवृत्तीवेतन धारकांसाठी हयातीच्या दाखल्याबाबत पर्यायी कार्यपध्दती

निवृत्तीवेतन धारकांसाठी हयातीच्या दाखल्याबाबत राबवीण्यात येणा-या विद्यमान कार्यपध्दतीत उपरोक्त संदर्भित कार्यपध्दती वारंवार राबवावी लागू नये व त्याकरीता आवश्यक मनुष्यबळाची बचत करण्याच्या दृष्टीकोनातून भारत सरकारच्या माहिती तंत्रज्ञान खात्याने ज़ीवन प्रमाण ही पर्यायी संगणक कार्यप्रणाली निवृत्तीवेतनधारकांना व निवृत्तीवेतनाचे अधिदान करण-या अधिकृत आस्थापनांना इलेक्ट्रॅनीक कार्यपध्दतीने डिजीटल स्वरूपात हयातीच्या

- दाखल्याची नोंदणी व त्याचे विहित कालावधीनंतर प्रमाणीकरण करण्यासाठी विकसीत केली आहे.
- सदर कार्यप्रणाली प्रत्येक भारतीय नागरीकाकरीता भारतीय विशिष्ट ओळख प्राधिकरणाने (UIDIA) विकसीत केलेल्या संगणकीय कार्यप्रणालीमध्ये (आधारकार्डामध्ये) अद्ययावत असलेला तपशील आधारभूत मानते.
- सदर कार्यप्रणाली निवृत्तीवेतनधारकांना व निवृत्तीवेतनाचे अधिदान करणाऱ्या अधिकृत आस्थापनांना विनामुल्य उपलब्ध करून देण्यात आली आहे.
- सदर संगणकीय कार्यप्रणालीव्दारे निवृत्तीवेतनधारकांसाठी डिजीटल स्वरूपात हयातीचा दाखला / प्रमाणपत्र तयार करण्याची, जतन करण्याची व परिरक्षीत करण्याची सुविधा उपलब्ध आहे.
- निवृत्तीवेतनाचे अधिदान करणा-या भारतातील कोणत्याही सरकारी,निमसरकारी,सरकारी उपक्रम इ. संस्था / आस्थापनांना सदर संगणकीय कार्यप्रणालीव्दारे त्यांच्या संस्थेशी / आस्थापनेशी निगडीत निवृत्तीवेतनधारकांचा डिजीटल स्वरूपातील हयातीचा दाखला / प्रमाणपत्र संदर्भासाठी, अभिलेखासाठी तयार करणे, जतन करणे व परिरक्षीत करण्याची सुविधा जीवन प्रमाण कार्यप्रणाली उपलब्ध आहे.
- केंद्र सरकार, राज्य सरकार, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या अखत्यारीतील विविध खाती / विभागात तसेच केंद्र व राज्य सरकारच्या उपक्रमांतील निवृत्तीवेतनधारकांना आधारकार्डाच्या बायोमेट्रीक तपशीलाशी संलग्न केलेली जीवन प्रमाण कार्यप्रणालीत हयातीच्या दाखल्यातील तपशील अद्ययावत करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.
- भारत सरकारच्या अर्थमंत्रालयाने प्रदर्षित केलेल्या आर्थिक सर्वेक्षण अहवालानुसार केंद्र सरकार, राज्यसरकार, केंद्रशासीत प्रदेश, निमसरकारच्या विविध मंत्रालये, खाती, कार्यालये,



१-२९४१५

उपक्रम व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या आस्थापनेवरील आजघडीला एकूण मिळून १.५२ कोटी कुटूंब उदरनिर्वाहासाठी निवृत्तीवेतनावर अवलंबून आहेत असे निष्पन्न झाले आहे .

# जीवनप्रमाण कार्यप्रणालीची कार्यपध्दती खालीप्रमाणे आहे.

## निवृत्तीवेतनधारकांनी स्वतःची नोंदणी करणे.

निवृत्तीवेतनधारक वैयक्तिक संगणकावर / अँड्रॉईड सुविधा उपलब्ध असणा-या भ्रमण दुरध्वनी संचावर जीवनप्रमाण कार्यप्रणाली डाऊनलोउ करून त्यामध्ये स्वतःची नोंदणी करून घेऊ शकतात किंवा नजीकच्या जीवनप्रमाणसहाय्य केंद्रावर प्रत्यक्ष जाऊन जीवनप्रमाण संगणक कार्यप्रणालीमध्ये स्वतःची नोंदणी करून घेऊ शकतात.

**निवृत्तीवेतनधारकांनी नोंदणी करतांना कृपया निम्नलिखित तपशीलाच्या नोंदी जीवन प्रमाण कार्यप्रणालीमध्ये एकदा अद्ययावत करणे क्रमप्राप्त आहे.**

a) स्वतःचे संपूर्ण नाव
b) जन्म दिनांक
c) आयकर स्थायी क्रमांक (PAN No.)
d) आधार क्रमांक
e) वर्तमान निवासाचा संपूर्ण टपाल पत्ता पिन क्रमांकासहीत
f) निवृत्तीवेतनासाठी कायदेशीर वारसांची नावे
g) स्वतःचे वर्तमान छायाचित्र
h) निवृत्तीवेतनाचे अधिदान करणाऱ्या अधिकृत आस्थापनेचे / संस्थेचे संपूर्ण नोंदणीकृत नाव, आस्थानेचा संपूर्ण नोंदणीकृत टपाल पत्ता पिन क्रमांकासहीत
i) निवृत्तीवेतनधारकाने निवृत्तीपूर्वी भुषविलेले शेवटचे पदनाम
j) निवृत्तीवेतनधारकाने निवृत्तीपूर्वी कार्यरत शेवटचे खाते / विभाग / कार्यालयाचे संपूर्ण नोंदणीकृत नाव
k) निवृत्तीवेतन अधिदान आदेश (पेन्शन पेमेंट ऑर्डर) अनुक्रमांक व दिनांक
l) बँकेचे नाव
m) निवृत्तीवेतन बँक खाते क्रमांक
n) बँकेचा आयएफएस संकेतांक
o) बँकेचा एमआयसीआर संकेतांक
p) वैयक्तिक दुरध्वनी क्रमांक (Personnel Mobile No.)
q) वैयक्तिक ई टपाल पत्ता (Personnel E Mail ID)



J-२१९१५

निवृत्तीवेतनधारकांनी स्वतःबाबत उपरोक्त संदर्भित सर्व तपशील अद्ययावत करतांना त्यासोबतच बायोमेट्रीक यंत्राव्दारे हाताच्या / पायाच्या दाही बोटांचे ठसे व आयरीस यंत्राव्दारे डोळयांचा बायोमेट्रिक तपशील जीवनप्रमाण संगणक कार्यप्रणालीमध्ये अद्ययावत करणे अत्यावश्यक आहे.

## हयातीच्या दाखल्याचे प्रमाणीकरण

निवृत्तीवेतनधारकांनी जीवनप्रमाण कार्यप्रणालीमध्ये हयातीच्या दाखल्याकरीता जो तपशील अद्ययावत केला आहे त्याची भारतीय विशिष्ठ पहचान प्राधिकराणाने (UIDIA) विकसीत केलेल्या संगणकीय कार्यप्रणालीमध्ये (आधारकार्डामध्ये) अद्ययावत असलेल्या तपशीलाशी तुलनात्मक पडताळणी करून जर तो तंतोतंत जुळल्यास जीवनप्रमाण कार्यप्रणालीव्दारे हयातीच्या दाखल्याचे प्रमाणीकरण केले जाते. निवृत्तीवेतनधारकांनी स्वतःबाबत उपरोक्त संदर्भित सर्व तपशील अद्ययावत करतांना त्यासोबतच बायोमेट्रीक यंत्राव्दारे हाताच्या / पायाच्या दाही बोटांचे ठसे व आयरीस यंत्राव्दारे डोळयांचा बायोमेट्रिक तपशील जीवनप्रमाण संगणक कार्यप्रणालीमध्ये अद्ययावत करणे अत्यावश्यक आहे.

## आपले जीवन प्रमाणपत्र मिळवा.

जीवन प्रमाण ओळखक्रमांक किंवा आधार क्रमांकाव्दारे संबंधित निवृत्तीवेतनधारकाला जीवनप्रमाण कार्यप्रणालीच्या अधिकृत संकेतस्थळावर स्वतःचे डिजीटल स्वरूपातील जीवनप्रमाण प्रमाणपत्र (डिजीटल स्वरूपातील हयातीचा दाखला) पहाता येईल व ते पीडीएफ स्वरूपात डाऊनलोड करून संदर्भासाठी व अभिलेखासाठी जतन करता येते.

## हयातीचा दाखला / प्रमाणपत्र (लाईफ सर्टिफिकेट)

- संबंधित निवृत्तीवेतनधारकाने जीवनप्रमाण कार्यप्रणालीमध्ये अद्ययावत केलेल्या सर्व तपशीलाची भारतीय विशिष्ठ पहचान प्राधिकराणाने (UIDIA) विकसीत केलेल्या संगणकीय कार्यप्रणालीमध्ये (आधारकार्डामध्ये) अद्ययावत असलेल्या तपशीलाशी तुलनात्मक पडताळणी केल्यावर व तो तंतोतंत जुळल्यावरच जीवनप्रमाण कार्यप्रणालीव्दारे संबंधित निवृत्तीवेतनधारकाच्या अद्ययावत भ्रमणदुरध्वनी क्रमांकावर "प्रमाणीकरण यशस्वीपणे पूर्ण झाले आहे" अशा आशयाचा संदेश निवृत्तीवेतनधारकाच्या माहितीकरीता परस्पर पाठविला जातो.
- जीवनप्रमाण संगणक कार्यप्रणालीमध्ये नोंदणीकृत निवृत्तीवेतनधारकांचे डिजीटल स्वरूपातील हयातीचे दाखले परिरक्षीत व जतन करण्याची सुविधा उपलब्ध आहे.
- निवृत्तीवेतनधारकांना व निवृत्तीवेतनाचे अधिदान करणा-या अधिकृत आस्थापनांना सदर डिजीटल स्वरूपातील हयातीचे दाखले संदर्भासाठी जीवनप्रमाण कार्यप्रणालीव्दारे जगात कोठेही उपलब्ध करून देण्याची सुविधा उपलब्ध आहे.

## निवृत्तीवेतनाचे अधिदान करणारी अधिकृत संस्था (पेन्शन वितरण संस्था)

जीवनप्रमाण कार्यप्रणालीमध्ये नोंदणी केलेल्या निवृत्तीवेतनाचे अधिदान करणा-या अधिकृत आस्थापनेला / संस्थेला जीवनप्रमाण कार्यप्रणालीव्दारे नोंदणीकृत निवृत्तीवेतनधारकांच्या हयातीच्या दाखला / प्रमाणपत्रात अद्ययावत केलेला तपशील पहाण्यासाठी उपलब्ध करून देण्याची, जीवनप्रमाण कार्यप्रणालीत अद्ययावत असलेले डिजीटल स्वरूपातील हयातीचे प्रमाणपत्र डाऊनलोड करण्याची व वेळोवेळी निवृत्तीवेतनधारकाकरीता सुधारीत नोंदी अद्ययावत करण्याची सुविधा उपलब्ध आहे.

# इलेक्ट्रॉनिक वितरण

मानवी हस्तक्षेपाशिवाय डिजीटल स्वरूपातील ह्यातीचा दाखला किंवा प्रमाणपत्र इलेक्ट्रॉनिक पद्धतीने निवृत्तीवेतनाचे अधिदान करणा-या अधिकृत संस्थेला / आस्थापनेला उपलब्ध करून देण्याची सुविधा जीवनप्रमाण कार्यप्रणालीमध्ये उपलब्ध आहे.

केंद्र सरकार, राज्य सरकार, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या अखत्यारीतील विविध खाती / विभागात तसेच केंद्र व राज्य सरकारच्या उपक्रमांतील निवृत्तीवेतनतनधारकांना आधारकार्डाच्या बायोमेट्रीक तपशीलाशी संलग्न केलेली जीवनप्रमाण कार्यप्रणालीत ह्यातीच्या दाखल्यातील तपशील अद्ययावत करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

भारत सरकारच्या अर्थमंत्रालयाने प्रदर्षित केलेल्या आर्थिक सर्वेक्षण अहवालानुसार केंद्र सरकार, राज्यसरकार, केंद्रशासीत प्रदेश, निमसरकारच्या विविध मंत्रालये, खाती, कार्यालये, उपक्रम व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या आस्थापनेवरील आजघडीला एकूण मिळून १.५२ कोटी कुटूंब उदरनिर्वाहासाठी निवृत्तीवेतनावर अवलंबून आहेत असे निष्पन्न झाले आहे .

# निवृत्त वेतनधरकांची माहिती

1. कर्मचारी संकेतांक :
2. नाव :
3. लिंग:
4. जन्म तारीख
5. नियुक्ती दिनांक:
6. विभक्तीचा दिनांक :

- निवृत्ती वेतनधारकाच्या संपर्काबाबतची माहिती

1. वैयक्तिक भ्रमणदूरध्वनी:
2. वैयक्तिक दूरध्वनी घर:
3. पत्ता :

| अ.क्र | नाव | c/o | घराचे/इमारतीचे नाव | रस्त्याचे नाव | पिन कोड | शहर | तालुका | देश |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | |

- निवृत्ती वेतनधारकाच्या कुटुंब निवृत्ती वेतन नामनिर्देशनाची माहिती:

| अ.क्र | नाव | निवृत्ती वेतनधारका बरोबरचे नाते | दिव्यांग | लिंग | जन्म दिनांक | पॅन क्रमांक | आधार क्रमांक | वैवाहिक स्थिती |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | |

- निवृत्ती वेतनधारकाच्या भविष्यनिर्वाहनिधी नामनिर्देशनाची माहिती

| अ.क्र | नाव | निवृत्ती वेतनधारका बरोबरचे नाते | लिंग | जन्म दिनांक | पॅन क्रमांक | आधार क्रमांक |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |

- MCGM Link:

NSDMC 53 - BMPP- 29895 - 2017-18 - 1000 copy.